# शासकीय अध्यापक महाविद्यालय,पनवेल

## ८० वा " स्वातंत्र्य दिन" चिरायू होवो.!

## अहवाल

---

भारताचा ८० वा "स्वातंत्र्य दिन" शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल येथे अत्यंत उत्साहपूर्ण, शिस्तबद्ध व राष्ट्रभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला.

### ध्वजारोहण

महाविद्यालयाच्या सन्माननीय प्राचार्य डॉ.रमा भोसले यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहणानंतर प्रथम व द्वितीय वर्षातील छात्राध्यापकांनी सामूहिकरित्या वंदे मातरम्,राष्ट्रगीत,ध्वजगीत, राज्यगीताचे सामूहिक गायन केले.

### देशभक्तीपर समूहगीत गायन

महाविद्यालयातील सेमिनार कक्षामध्ये "देशभक्तीपर समूह गीतगायन” कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमांमध्ये महाविद्यालयातील बी. एड् द्वितीय वर्ष प्रशिक्षणार्थ्यांनी देशभक्तीपर गीताचे समूहगायन आंतरवासिताच्या गटानुसार केले.त्याचबरोबर महाविद्यालयाच्या सेवानिवृत्त प्राध्यापिका श्रीमती. बिजली दडपे व महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी श्री. प्रतीक पवार यांनीही स्वातंत्र्य दिनाचे अधिक माहिती देऊन विद्यार्थ्यांना शुभ संदेश दिला.

## अध्यक्षीय भाषण

महाविद्यालयाच्या प्राचार्य.डॉ. रमा भोसले यांनी ८० वा स्वातंत्र्य दिनानिमित्त अध्यक्षीय भाषण केले.या प्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकवृंद, कार्यालयीन कर्मचारी, द्वितीय वर्षाचे छात्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांमध्ये राष्ट्रप्रेम, राष्ट्रनिष्ठा आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना निर्माण झाली. सदर कार्यक्रम छात्र परिषदेच्या समन्वयक मा प्रा. डॉ. सुभेदार पी. पी. यांच्या मार्गदर्शनानुसार संपूर्ण वेळेत शिस्त, शांतता व उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या संपन्न झाला

## छायाचित्रे:-




महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. रमा भोसले, सर्व प्राध्यापिका वृंद, कार्यालयीन कर्मचारी व द्वितीय वर्ष छात्राध्यापक राष्ट्रध्वजाला सलामी देताना.




महाविद्यालयाचे द्वितीय वर्ष छात्राध्यापक राष्ट्रध्वजाला सलामी देताना.




आंतरवासिता गट क्रमांक १ चे द्वितीय वर्ष छात्रअध्यापक व छात्राध्यापिका देशभक्तीपर गीताचे गायन करताना







आंतरवासिता गट क्रमांक २ आणि गट क्रमांक ३ चे द्वितीय वर्ष छात्रअध्यापक व छात्राध्यापिका देशभक्तीपर गीताचे गायन करताना







महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी श्री.प्रतीक पवार विद्यार्थ्यांना शुभसंदेश देऊन मार्गदर्शन करताना .

महाविद्यालयाच्या सेवानिवृत्त प्राध्यापिका बिजली दडपे विद्यार्थ्यांना शुभसंदेश देऊन मार्गदर्शन करताना .




महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. रमा भोसले अध्यक्षीय भाषण करताना